Vol 3 Issue 11 May 2014 ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

# Welcome to GRT

RNI MAHMUL/2011/38595 ISSN No.2231-5063

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest,Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.net**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052(UIF)
Volume-3 | Issue-11 | May-2014
Available online at www.aygrt.isrj.net

GRT

# *महाराष्ट्रातील महिला उद्योजिका*

*मीनाक्षी तडस*

गृहअर्थशास्त्र विभागप्रमुख , एस. एस. जायस्वाल कॉलेज , अर्जुनी/मोर जि. गोंदिया

***सारांश :-***स्त्रियांची उद्योजकता म्हणजे स्त्रियांनी स्थापन केलेले किंवा स्त्रियांकडून ज्यांचा कारभार संचालित होतो असे उद्योग. भारताच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास स्त्रियांची उद्योजकता हे स्त्रियांच्या कर्तृत्वासाठी नव्याने उपलब्ध झालेले क्षेत्र आहे.

## *प्रस्तावना :*

भारतात आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये स्त्री उद्योजक महत्त्वपूर्ण योगदान करू शकतात ही बाब दीर्घकाळापर्यंत दुर्लक्षित राहिली. मात्र स्त्रियांच्या जागतिक व राष्ट्रीय स्तरांवरील परिषदांमधून करण्यात आलेल्या मागण्यांचे पडसाद सर्वत्र उमटले आणि 1991 साली औद्योगिक धोरणाविषयक ठरावामध्ये स्त्रियांच्या उद्योजकतेबाबत प्रथमच विचार करण्यात आला.

आपल्या देशातील स्त्री उद्योजकतेच्या संदर्भात उद्योजकाला म्हणजे दोन प्रकारच्या घटकांची निष्पत्ती आहे, असे मानले जाते. ह्या घटकांना 'Pull & PushFactor'असे म्हणतात. आपल्या बुध्दिचा, क्षमतेचा, कौशल्याचा, वेळेचा व संबंधाचा योग्य उपयोग करून घ्यावा व आपली महत्त्वाकांक्षा पूर्ण करावी. नवनवीन आवाहने स्विकारावीत. समाजात स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण करावे आणि आपल्या आर्थिक व सामाजिक स्थितीमध्ये सुधारणा करावी अशा विचारांनी प्रेरित होऊन अनेक स्त्रिया उद्योजक बनतात. स्त्रियांना उद्योजकीय भूमिका स्विकारण्यासाठी उद्युक्त करणाऱ्या ह्या विशिष्ट घटकांना Pull Factor म्हणतात. स्वतःची व कुटुंबाची उपजिविका चालविण्यासाठी आवश्यक असलेले पैसे मिळविण्याकरिता, आपल्या मुलांना रोजगार उपलब्ध करून देऊन त्यांची सोय लावण्याकरिता, कुटुंबाची विस्कटलेली आर्थिक घडी नव्याने नीट बसविण्यासाठी, आर्थिक दुर्दशा व कौटुंबिक आपत्तीमधून मार्ग काढण्याकरिता, स्वतःचे सैरभैर झालेले व्यक्तिगत जीवन सावरण्याकरिता स्त्रियांनी उद्योगांची स्थापना केल्यास, स्त्रियांना उद्योजक बनण्यासाठी भाग पाडणाऱ्या, त्यांना ह्या वळणावर ढकलणाऱ्या घटकांना च्नौ थ्बजवत म्हणतात. मात्र हे दोन्ही घटक सर्वस्वी भिन्न नाहीत.

मॅनेजमेंट गुरू पीटर यांनी अमेरिकेतील एका भाषणात 'आदर्श व्यवस्थापक कोणाला मानावे? तर भारतीय गृहिणीला' असा उल्लेख करून भारतीय गृहिणीला एक प्रकारे गौरविले आहे. त्यांनी कुटुंब व्यवस्था, त्यामधील स्त्रीचे स्थान, तिचे कामाचे स्वरूप, अशिक्षितपणा, मेहनती वृत्ती, लहरी पती, हट्टी मुले, दारिद्र्य, काटकसरीपणा इत्यादी सर्वांचा बारकाईने अभ्यास करून त्यावरूनच हा निष्कर्ष काढला होता.

## *भारतातील स्त्री उद्योजकांच्या महत्त्वपूर्ण प्रेरणा*

1.विधायक कार्यामध्ये स्वतःला व्यस्त ठेवणे.
2.स्वतःची आवड जोपासणे.
3.पैसे मिळविणे.
4.सन्मान व प्रतिष्ठा मिळविणे.

## *स्त्रियांच्या उद्योजकतेला सहाय्य करणारे घटक*

1.स्त्रियांमध्ये असलेले उपजत गुण.
2.सामाजिक वातावरणामध्ये घडून आलेले बदल.
3.स्त्रियांची चळवळ
4.स्त्री उद्योजकांच्या संघटना
5.सरकारी पातळीवरून देण्यात आलेल्या सवलती
6.व्यवहारांचे नियोजन

7.परिवर्तनांची प्रक्रिया

### *महाराष्ट्रातील महिला उद्योजिका*

सर्वसामान्य महाराष्ट्रीयन माणसाला व्यवसायाचे वावडे आहे. व्यवसायातील यशाच्या आत्मविश्वासापेक्षा अपयशाच आत्मविश्वासच जास्त असल्याने मराठी माणसे व्यवसायात एक पाऊल मागेच असतात. मग महिलांची गोष्ट तर दूरच राहिली. परंतु काही महिलांनी स्वतःच्या उपजत कलांचा विकास स्वतःच करून घेतलाय, तर काहींनी अगदीच वेगळ्या स्वरूपाचे व्यवसाय सुरू करून यश मिळवलंय. या सगळ्या सर्वसामान्य घरातील स्त्रिया आहेत.

1.कांचन तांबे, मनीषा जोशी, सुनीती पाटील व मेघना टकले या समविचारी महिलांमध्ये उद्योजकता वाढावी यासाठी तळमळ असणाऱ्या महिलांच्या मदतीने अलकाताई बांदेकर यांनी लेडीज नेटवर्क वेल्फेअर असोसिएशनची स्थापना केली. त्यायोगे सर्वात महत्त्वाचे व मोलाचे काम केले जाते ते म्हणजे महिलांना त्यांच्या स्वत्वाची जाणीव करून देणे, त्यांच्यातील क्षमतांची जाणीव करून देणे व आत्मविश्वास जागृत करून स्वयंप्रेरित करणे. यशस्वी उद्योजिका निर्माण करण्यासाठी नामवंत व्यक्तींची भाषणे ठेवून महिलांना स्वयंप्रेरित करून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकासही घडवून आणतात. इंग्रजी संभाषण, व्यक्तिमत्त्वविकास, मार्केटिंगचे तंत्र, निर्णयक्षमता, वेळेचे व्यवस्थापन इत्यादी बाबत प्रशिक्षण दिले जाते. कार्यशाळा व चर्चासत्रे आयोजित केले जातात.
2.सौ. अश्विनी पाटील–आवटे या मराठमोळ्या वातावरणात वाढलेल्या मुलीने फ्रान्समधील बोर्दो येथील शेतकी विद्यापीठात "Masters Vintage in Vine & Wine Management" हा दोन वर्षांचा कोर्स पूर्ण करून 'अश्विनी वाईन्स' या नावाने कंपनी सुरू केली आहे. या कंपनीच्या माध्यमातून ती द्राक्षांचे उत्पादन काढणाऱ्या शेतकऱ्यांना वाईन तयार करणे व निर्यात करणे याबाबत मार्गदर्शन करते.
3)मध्यमवर्गीय गुजराती कुटुंबात जन्मलेल्या व लग्नानंतर मुंबईत आलेल्या रमा शाह यांनी कलेचा पिढीजात वारसा लाभलेला नसतानाही केवळ आवड असल्यामुळे 99,999 गणपती तयार करून नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. या विक्रमाची नोंद लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकार्डमध्ये केली गेली आहे. यासाठी त्यांनी कोणताही मोल्ड न वापरता, कोणाचीही मदत न घेता निरनिराळ्या आकारातील रंगातील, रूपातील, पोजमधील, वेशांतील गणपतीची निर्मिती केली आहे.
4)शहनाज सुरा या तरूणीने कारमध्ये उत्तम डिझाईन व रंगसंगती असलेले सीट कव्हर व इतरही सजावट करून देण्याचा व्यवसाय एक्सक्लूसिव्ह क्रिएशन या नावाने सुरू केलाय.
5)1975 साली जेव्हा मुलींची क्षेत्रे चूल आणि मूल किंवा एखादी सरकारी नोकरी एवढ्या पुरतेच मर्यादित होते. अशा परिस्थितीत क्रीडा साहित्याचे दुकान चालविणे आणि क्रिडा साहित्याची होलसेल विक्री पुण्याच्या सौ. आशा दत्ताराम शिंदे या महिलेने 'आशा एजन्सी' या नावाने सुरू केली असे काम करणाऱ्या महाराष्ट्रातील त्या एकमेव महिला आहेत.
6)पतीच्या अकाली निधनानंतर श्रीमती उषा यशवंत शिंदे यांनी अनुभव नसतानाही त्यांचा व्यवसाय भरभराटीस आणला. यासाठी त्यांना अनेक पुरस्कार मिळालेत. आज त्या चार कपंन्याचा कारभार चालवित आहेत.
7)आजकाल कुत्रे पाळण्याकडे लोकांचा कल वाढला आहे. अशा कुत्र्यांसाठी पहिले पेट सलून सुरू करण्याचे श्रेय जाते सौ. पुजा कर्वे या तरूणीकडे.
8)पूण्याजवळच्या वडगांव शेरी येथील सौ. सेवा संजीव गोखले या महिलेने वयाच्या चाळीशीला लाडू बनवण्याचा व्यवसाय 'मे.एस. गोखले गृहउद्योग' या नावाने सुरू केला. मुगाच्या डाळीचे, हरभऱ्याच्या डाळीचे, नाचणीचे व पंचधान्याचे लाडू मोठ्या प्रमाणात तयार करून मोठमोठ्या स्टोअरमध्ये विकायला देतात. त्यांच्या लाडूसाठी त्यांनी 'डेलीवन' हा ट्रेडमार्क घेऊन तो रजिस्टरही केला आहे.
9)नोकरी / व्यवसाय करणाऱ्या महिलांची वेळेची अडचण जाणून ठाण्याच्या सौ. लक्ष्मी मधुकर मोरे यांनी धुवून, कापून, निवडून, चिरून 'रेडी टू कूक' केलेल्या भाज्यांचा रतीब सुरू केलाय. 'लक्ष्मीज फार्म फ्रेश व्हेजिटेबल्स' या नावाने त्यांनी हा व्यवसाय सुरू केला.
10)सुनीता नागपाल मेनन या मुंबईच्या महिलेने कृत्रिम फूले, झाडे, वृक्ष इ. बनवण्याचा व्यवसाय सुरू केलाय. तिला जवळजवळ 2000 प्रकारची कृत्रिम फुले बनवता येतात. कृत्रिम फुलांचा वापर करून बनवलेल्या पुष्परचना, कृत्रिम झाडांच्या कुंड्या, कृत्रिम झाडे इ. तिने तिच्या 'टेम्पल ऑफ फ्लॉवर्स' या दुकानात विक्रीसाठी ठेवली आहेत.

हल्लीच नागपूर विमानतळाचे नूतनीकरण व सुशोभीकरण करण्यात आले तेथे विमानतळाच्या आत कृत्रिम झाडांच्या कुंड्या, तसेच मोठी झाडे ठेवून शोभा वाढवली आहे ती सुनीतानेच तयार केलेल्या झाडांमुळे.

11)अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या कमल कवाद यांनी 'कवाद फिशरीज कंपनी सुरू करून निर्यात कंपनीला विविध प्रकारचे मासे पुरवण्याचे व्यवसाय 1993 सालापासून सुरू केला आहे.
12)मध्यमवर्गीय अशा मराठमोळ्या दादरच्या वातावरणात वाढलेली रजनी पंडित यांनी 1986 एक डिटेक्टिव्ह संस्था रजनी इन्व्हेस्टिगेटर ची स्थापना केली आहे.
13)इकोफ्रेंडली कागदापासून अनेक प्रकारच्या वस्तू बनवण्याचा उद्योग पुण्याच्या केतकी नितीन गोगटे या उद्योजिकेने सुरू केलाय.
14)तबला आणि ढोलक, ढोलकी ही वाद्ये म्हणजे पुरूषांनीच वाजवायची अशी मानसिक बैठक असलेल्या समाजात कुटुंबाच्या प्रोत्साहनाने तबला वाजवण्याचे कौशल्य संपादन केलंय सौ. सुलक्षणा फाटक यांनी तर ढोलक ढोलकी व तबला वादनात पारंगत झालीय सौ. निवेदिता मेहंदळे.
15)हल्ली कुटुंबाचा ऱ्हास झाल्याने विभक्त कुटुंबात वडिलधाऱ्या स्त्रिया नसल्याने किंबहुना नऊवारी साडी नेसणाऱ्यांची पिढीही आता संपत

आल्यामुळे नऊवारी साडी नेसणे एक संकटच होऊन बसले आहे. त्यासाठी ठाण्याच्या मनीषा मोहन जोशी या महिलेने नऊवारी साड्या, पाचवारी साड्या, सोवळे, धोतळ इ. शिवून देण्याचा व्यवसाय सुरू केलाय.
16)भरतकामातील पॅचवर्क या पध्दतीचा वापर करून गणपती व इतर देवतांच्या फ्रेम्स बनवून देण्याचा व्यवसाय सुरू केलाय मुंबईतील दादरच्या सौ. वंदना ठाकूर यांनी.
17)रॉट आयर्नचे पावडर कोटिंग केलेल्या नक्षीदार कुंड्या ठेवण्याचे स्टॅण्ड बनवण्यास सुरूवात करून आज घरातील प्रत्येक खोलीत किंवा कोपऱ्यात लागणाऱ्या फर्निचरचे रॉट आयर्न मध्येच उत्पादन करण्याचा व्यवसाय आहे कोल्हापूरच्या शैलजा उदयराव सूर्यवशी यांचा.
18)ब्रेडचा चुरा व फेव्हिकॉलच्या मिश्रणाने विविध प्रकारची फळे बनवून तयार केलेल्या छोट्या छोट्या फळांच्या टोपल्या, टोमॅटो, वांगी, गाजर इ. भाज्यांचा शोभिवंत टे, नॅपकीन रिंगची सजावट, आरशाच्या चौकटीची सजावट, फोटोफ्रेमच्या चारी बाजूला वेलबुट्टींनी सजावट इ. कल्पना जव्हेरी यांच्या मुंबईतील स्टुडिओत बघायला मिळतील.
19)आजच्या बदलत्या जीवनशैलीनुसार रेडीमेड ब्लाऊज ही एक गरजेची वस्तू बनलीय. असा व्यवसाय सुरु केलाय ठाण्याच्या श्वेता इनामदार या महिलेने जवळजवळ 15000 रेडिमेड ब्लाऊज दुकानात तयार असतात.
20)अनेक टी.व्ही. चॅनेल्स, सौंदर्य स्पर्धा, क्रिकेटच्या, विविध कंपन्यांच्या व बँकांच्या स्पर्धा, विविध प्रकारच्या रॅलीज इ. साठी लागतात ॲवार्डस, ट्राफीज, स्मरणचिन्हे इ. झी. अवॉर्डस, सिने ॲवार्ड, शारजा वर्ल्ड कप इ. सारख्या ट्रॉफीज, ॲवार्डस यांचे अतिशय कल्पकतेने डिझाईन करून त्याचे उत्पादनही स्वतःच करून पुरवठ्याचा व्यवसाय बिजल कलबाग या महिलेने सुमारे 12 वर्षांपूर्वी सूरू केला.
21)ठाण्याच्या डॉ. सुजाता सुनील पवार या अल्टरनेटिव्ह मेडिसीन शाखेच्या पदवीधर व निसर्गोपचाराचा कोर्सही पूर्ण केलेल्या महिलेने आपले वैद्यकशास्त्रातले ज्ञान वापरून, आपल्या ज्ञानाची लोकांच्या गरजेशी सांगड घालून लोकांना आरामदायी वाटणाऱ्या अशा सुजलाम गाद्यांची निर्मिती 'निद्रा क्रिएशन्स' या नावाने कपंनी सुरू केली आहे. 'सुजलाम' ही पूर्णतः नैसर्गिक व आयुर्वेदिक तत्वांपासून बांधण्यात येणारी पांरपारिक वारसा असलेली व अनेक शारीरिक व्याधींवर परिणामकारक अशी गादी आहे.

अशा या महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातल्या वादळवारा याची तमा न बाळगता आत्मविश्वासाने तेवणाऱ्या पणत्या आहेत. या पणत्यांना आपणासमोर आणावे व या पणत्यांच्या सहाय्याने अनेक पणत्या लावून सारा आसमंत उजळून निघावा  या हेतूने हा प्रयत्न केला आहे.

### *संदर्भ ग्रंथ सूची*


1.महिला स्वयंसहाय्यता बचत गटप्रा. एस.पी. मुलानी
2.स्त्रियांचे सामाजिक सक्षमीकरण स्वाती डेहाडराय, अंबिका तांबे
3.महिलांसाठी मोलाचे उद्योग अरूणा कौलगुड
4.उद्योजकता योगिराज हरीशचंद्र देवकर
5.व्यावसायिक उद्योजकता जयंत जोशी
6.गृहलक्ष्मीचा उद्योग स्वामिनी विलास आहेर पर्यंतचा प्रवास, उद्योजक एप्रिल 2009
7.व्यापार संघटन प्रा. कुऱ्हाडे
8.उद्योजकता मासिक ऑगस्ट 2011 डॉ. श्री.वि. कडवेकर
9.सकाळ 24 ऑगस्ट 2011
10.उद्योजकीय संस्कृती आणि महाराष्ट्र
12.www. google.com
13.महाराष्ट्रातील महिला उद्योजक प्रा. शैलजा सांगळे





***मीनाक्षी तडस***
गृहअर्थशास्त्र विभागप्रमुख , एस. एस. जायस्वाल कॉलेज , अर्जुनी/मोर जि. गोंदिया

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.net